# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राहुलबाबाला MSP चा फुल फॉर्म; खरीफ-रबी पिकातील फरक माहितेय का? शाहांची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ रेवाडी हरियाणा**

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रेवाडी येथे प्रचारसभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर सडकून टीका केली. काँग्रेस नेत्यांनी अग्निवीर योजनेबाबत लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम केले आहे. आज देशाच्या सीमा सुरक्षित आहेत, जम्मू-काश्मीर सुरक्षित आहे, यात हरियाणाच्या सैनिकांचे त्याग आणि शौर्य सामील आहे, असे अमित शाह म्हणाले.

शाह पुढे म्हणतात, हरियाणात काँग्रेसची सत्ता असताना कट, कमिशन आणि भ्रष्टाचारावर भर असायचा. व्यापारी, दलाल आणि जावयाचे राज्य होते. पण, भाजप सरकारमध्ये ना डीलर उरले ना दलाल, जावयाचा प्रश्नच नाही. राहुल गांधींना कुणीतरी सांगितले की, एमएसपीच्या मुद्द्यावरुन मते मिळतात. पण, मूळात राहुल यांना एमएसपीचा फुल फॉर्म माहितेय का? खरीप आणि रब्बी पिके कोणती असतात, त्यातील फरक तरी त्यांना माहीतेय का?

देशभरात सुरू असलेली काँग्रेसची सरकारे एमएसपीच्या नावाखाली



शेतकऱ्यांशी खोटे बोलत आहेत. हरियाणातील भाजप सरकार एमएसपीवर शेतकऱ्यांकडून २४ पिके खरेदी करत आहे. हरियाणातील काँग्रेस नेत्यांनी एकदा सांगावे की, तुमचे देशातील कोणते सरकार २४ पीक एमएसपीवर खरेदी करते? असा सवालही अमित शाह यांनी राहुल गांधींना यावेळी केला.

**अमेरिकेतील वक्तव्यावर टीका**

परदेशी भूमीवर केलेल्या वक्तव्यावरुन शाहांनी राहुल गांधींना धारेवर धरले. राहुल परदेशात जाऊन एसटी-एससी-ओबीसी समाजाचे आरक्षण संपवू, असे सांगतात. लोकसभा निवडणुकीच्या वेळी ते आमच्यावर आरोप करायचे की, आम्ही आरक्षण संपवणार आहोत, पण आता ते स्वतः अमेरिकेत जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा करतात. राहुलबाबा, तुम्ही आरक्षण कसे संपवाल? सरकार आमचे आहे. मी शब्द देतो की, जोपर्यंत संसदेत भाजपचा एकही खासदार आहे, तोपर्यंत तुम्ही आरक्षण संपवू शकत नाही, असा इशाराही शाहांनी यावेळी दिला.

**वन रँक वन पेन्शनवर काँग्रेसने दिशाभूल केली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये हरियाणामधून निवडणूक प्रचाराची सुरुवात केली, तेव्हा त्यांनी आश्वासन दिले होते की, आम्ही लष्करातील जवानांची वन रँक-वन पेन्शनची मागणी पूर्ण करू. आपल्या लष्कराचे जवान ४० वर्षांपासून ही मागणी करत होते. काँग्रेस ४० वर्षे वन रँक वन पेन्शन लागू करू शकली नाही, हउ मोदींनी वन रँक वन पेन्शन लागू केली, असेही शाह म्हणाले.

## सोमवारपर्यंत अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करा हायकोर्टाचे राज्य सरकारला आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई**

बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेंचा एन्काऊंटर करण्यात आला. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर त्याच्या अंत्यविधीला विरोध होत असून दफण करण्यासाठी जागा मिळत नसल्याची तक्रार त्याच्या पालकांनी केली आहे. या संदर्भात आज मुंबई उच्च न्यायालयामध्ये महत्वाची सुनावणी पार पडली. या सुनावणीत सोमवारपर्यंत अक्षय शिंदेंच्या मृतदेहाचे दफन करा, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच यासाठी राज्य सरकार जागा देणार असल्याचेही वकिलांकडून सांगण्यात आले आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याची पोलिसांच्या चकमकीत एन्काऊंटर झाला. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर त्याच्या अंत्यविधीला बदलापूरकरांचा मोठा विरोध पाहायला मिळाला होता. तसेच बदलापूरमध्ये त्याचा मृतदेह दफन करु देणार नाही, अशी भूमिका नागरिकांनी घेतली होती. याविरोधात अक्षय शिंदेच्या आई-वडिलांना उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

अक्षयच्या मृतदेहाची अवहेलना होत असून त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जावर आज सुनावणी पार पडली. या सुनावणीत उच्च न्यायालयाने सोमवारपर्यंत मृतदेह दफन करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यासाठी राज्य सरकार जागा उपलब्ध करून देणार आहे. राज्य सरकारच्या वकिलांनी याबाबत मुंबई उच्च न्यायालयात ग्वाही दिली आहे.

## महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचं बिगूल वाजणार

### केंद्रीय निवडणूक आयोगाचं शिष्टमंडळ मुंबईत दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई**

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसंच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू यांच्या शिष्टमंडळाचे गुरुवारी (२६ सप्टेंबर) मुंबई विमानतळावर आगमन झाले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचं स्वागत केलं.

राजकीय आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका : केंद्रीय निवडणूक आयोगाचे अधिकारी हे २७ ते २८ सप्टेंबर या दोन दिवसीय भेटी दरम्यान राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, मुख्य निवडणूक अधिकारी, मुख्य सचिव यांच्यासह राज्यातील विविध अंमलबजावणी अधिकारी यांच्यासोबत आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगानं आढावा बैठक घेणार आहेत. यानंतर निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्याची शक्यता आहे.

यापूर्वी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी १२ आणि १३ सप्टेंबर रोजी उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी आणि मुख्य जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन २८८ विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला होता. यावेळी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची स्थिती, अद्ययावत मतदार यादी, मतदान साहित्याची स्थिती आणि जिल्हास्तरीय निवडणूक व्यवस्थापन, विशेषत: मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची उपलब्धता आणि सुरक्षा व्यवस्था याविषयी माहिती घेतली. याशिवाय मतमोजणी सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय तयारीचा आढावाही मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतला होता.

## देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रालयातील दालनाची तोडफोड; अज्ञात महिलेच्या कृत्याने खळबळ

### महिला पास न काढताच मंत्रालयात पोहचली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयात घुसून अज्ञात महिलेने तोडफोड करत गोंधळ घातल्याचा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे मंत्रालयात खळबळ उडाली आहे. धक्कादायक म्हणजे ही महिला पास न काढताच मंत्रालयात गेल्याचे सांगितले जात आहे.

सचिवांसाठी असलेल्या गेटमधून या महिलेने मंत्रालयाच्या आवारात प्रवेश केला होता. यानंतर या महिलेने



आपला रोख फडणवीसांच्या कार्यालयाकडे वळविला. गुरुवारी सायंकाळची ही घटना असल्याचे सांगितले जात आहे.

मुंबईत पाऊस सुरु असल्याने मंत्रालयातील कर्मचाऱ्यांची घरी जाण्याची घाई सुरु होती. या मोक्याच्या वेळी ही महिला मंत्रालयात शिरल्याने पुन्हा एकदा सुरक्षा व्यवस्थेचे धिंधवडे निघाले आहेत. मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर फडणवीसांचे कार्यालय आहे. त्या कार्यालयाची पाटी या महिलेने काढून फेकून दिली. तसेच तिथे आरडाओरडा करत ठेवण्यात आलेल्या कुंड्या देखील फेकण्यास सुरुवात केली.

या घटनेनंतर ही महिला पसारही झाली. ही महिला कोण होती, ती कशासाठी आली होती? ती पसार कशी झाली आदी प्रश्नांची उत्तरे आता पोलीस प्रशासन शोधत आहे. परंतु, एकंदरीतच उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात घुसून गोंधळ घालत, तोडफोड करत बिनदिक्कत ही महिला बाहेरही कशी पडली, असाच प्रश्न सर्वांना पडला आहे.

## विधानसभेची निवडणूक एका टप्प्यात घ्या अजित पवार गटाची निवडणूक आयोगाकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाकडून कोणत्याही दिवशी होण्याची शक्यता आहेत. त्यासाठी राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा निवडणूक आयोगाकडून घेतला जात आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक ही एकाच टप्प्यात घ्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने केंद्रीय



निवडणूक आयोगाकडे केली आहे. अजित पवार गटाचे नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री अनिल पाटील यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगाकडे करण्यात आलेल्या मागणीबाबत माहिती देताना अनिल पाटील म्हणाले की, आमच्या पक्षाच्यावतीने शिवाजीरावा गर्जे आणि मी निवडणूक आयोगाकडे गेलो होते. महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक एकाच टप्प्यामध्ये झाली पाहिजे, अशी मागणी आम्ही तिथे केली. उमेदवारांसाठी असलेली निवडणूक खर्चाची मर्यादा वाढली पाहिजे. तसेच आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करताना उमेदवाराला एकदा तरी विचारलं पाहिजे. महाराष्ट्रातील परिस्थिती आणि महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य असल्याने इथे एका टप्प्यात निवडणूक घेतली तरी चालणार आहे, असे म्हणजे अनिल पाटील यांनी मांडले.

दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाकडून पुढील आठवडाभरात विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. २८८ सदस्य असलेल्या महाराष्ट्र विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार की ही निवडणूक दोन ते तीन टप्प्यांपर्यंत लांबणार याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. दरम्यान, २०१९ मध्येही महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक ही एकाच टप्प्यात झाली होती. त्यामुळे यावेळीही महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक एकाच टप्प्यात आटोपली जाईल, अशी शक्यता आहे.

## आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मिटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

महसुली बदल्या रद्द करण्यात याव्यात तसेच आकृतीबंधाची अंमलबजावणी करण्यात यावी या प्रमुख मागण्यासाठी मोटर वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेने राज्यभरात मागील तीन दिवसापासून सुरू केलेला बेमुदत संप गुरुवारी रात्री परिवहन आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर हा संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३० नोव्हेंबर पर्यंत वरिष्ठ लिपिक ते कार्यालय अधीक्षक पदाचे सेवा प्रवेश नियम अंतिम करण्यात येतील , पूर्वीप्रमाणेच पंधरा विभागा अंतर्गत बदल्या करण्याचे मान्य केले.प्रशासनाने इतर मागण्यावरही सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत तब्बल दोन तास बैठक झाली.या बैठकीत प्रमुख दोन्ही मागण्या मान्य केल्याने हा संप स्थगित केला



आहे. कळस्कर समितीचा सुधारित अहवाल लागू करण्यात येणार, विभाग बाह्य समायोजन रद्द करण्यात येणार , सेवाप्रवेशातील जाचक अटी रद्द करणार आधी मागण्या मान्य करण्यात आल्या.

गेल्या २४ सप्टेंबर पासून कर्मचारी संघटनेने बेमुदत संप सुरू केला होता. राज्यभरातील सर्व आरटीओ कार्यालय ओस पडली.अधिकाऱ्या शिवाय इतर कोणतेही कर्मचारी तीन दिवसकार्यालयीन कामात सहभागी झाले नाही.त्यामुळे कामाचा मोठा खोळंबा निर्माण झाला.कर्मचाऱ्यांच्या या संपामुळे तीन दिवसात परिवहन विभागाला मोठा आर्थिक फटका बसला.

> महसुली स्तरावर वेगवेगळे विभाग एकत्र करण्याचा निर्णय अन्यायकारक होता तो आता पूर्वीप्रमाणेच राहणार आहे , तसेच आकृतीबंधानुसार पदोन्नती केली जाणार असल्याची बैठकीत मान्य करण्यात आले, कळस्कर समितीच्या अहवालावर सुद्धा निर्णय झाला, बैठक समाधानकारक झाली . प्रशासनाने इतर मागण्यावरही सकारात्मक निर्णय घेण्याचे ही मान्य केले . प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्या मान्य करण्यात आल्याने , आता मागील तीन दिवसांपासून सुरू असलेला बेमुदत संप संपला आहे.
>
> **– अनिल मानकर, राज्य उपाध्यक्ष , मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटना तथा अध्यक्ष , अमरावती विभागीय आरटीओ कर्मचारी संघटना**

## बाप मेला तरी चालेल, पण नेता जिवंत राहिला पाहिजे - आ. बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ छत्रपती संभाजीनगर**

आम्ही सतरंजी उचलणारे आहोत. पण ज्यांच्यासाठी सतरंज्या टाकल्या त्यांचं वाटोळं केल्याशिवाय हा कार्यकर्ता राहणार नाही, अशी



टीका प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी महायुतीवर केली. छत्रपती संभाजीनगर येथे परिवर्तन आघाडीचा मेळावा घेण्यात आला. यावेळी बच्चू कडू यांच्यासह माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आणि स्वाभिमानी नेते राजू शेट्टी यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडलं. यावेळी बोलत असताना बच्चू कडू म्हणाले की, काँग्रेसवाल्यांची कोथळे बाहेर काढण्यासाठी ही सभा आहे. ज्या गडावर भेटतील त्या गडावर मारू. काँग्रेसनं स्वामीनाथन आयोग आणला. पण शिफारस मान्य केली नाही. मग, मोदी आले. त्यांनीही देश खड्ड्यात घातला. धर्मा-धर्मात भिडवणे ही यांची पॉलीसी आहे. बाप मेला तरी चालेल, पण नेता जिवंत राहिला पाहिजे, असं धोरण राज्यात चाललंय.

# संपादकीय ......

## बॅनरबाजी

जसजशा महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जवळ येत आहेत, तसतसे राजकीय वातावरण तापत चाललेले आहे. राज्यातील सर्वोच्च पद म्हणजे मुख्यमंत्रिपद होय. आधी २८८ जागांसाठी विधानसभा निवडणूक होतील. त्यातून २८८ आमदार निवडले जातील आणि त्यामधून एक मुख्यमंत्री निवडला जाईल हे ठरलेले आहे. प्रत्येक उमेदवाराचे एक गणित ठरलेले असते आणि आपण येत्या निवडणुकीमध्ये कसे सहजरीत्या विजयी होणार आहोत याचे प्रत्येकाचे आडाखे असतात. निवडणुका दूर असल्या तरी आतापासूनच उमेदवारी जाहीर होण्यास सुरुवात झालेली आहे. महायुती, महाआघाडी आणि आता नव्याने निर्माण झालेली तिसरी आघाडी हे सर्वजण कोणी किती जागा लढवायच्या याचे गणित मांडण्यात व्यस्त आहेत.

निवडणुका लढवल्या जातात त्या कार्यकर्त्यांच्या जोरावर. प्रत्येक कार्यकर्ता आपला उमेदवार एकदाचा आमदार व्हावा म्हणून जीवाचे रान करत असतो आणि आपला उमेदवार आमदार झाला तर पुढे मंत्री किंवा मुख्यमंत्री होऊ शकतो याची पण त्याला खात्री असते. आजघडीला राज्यामध्ये सर्वत्र भावी मुख्यमंत्री म्हणून विद्यमान आमदाराचे, माजी आमदाराचे किंवा उमेदवाराचे फोटो लावून बॅनर लावले जात आहेत. हा एक प्रकारचा वातावरणनिर्मितीचा खेळ आहे. भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर लावले की किमान पक्षी जनतेला सदरील सद्गृहस्थ आमदारकीला नक्की निवडून येईल, असे वाटायला सुरुवात होते. हा एक प्रकारचा पॉझिटिव्ह मेसेज मतदारसंघामध्ये पसरवणे असते. बॅनरवर भावी मुख्यमंत्री म्हणून ज्याचे नाव आणि फोटो असतो, त्याला आजूबाजूच्या दोन जिल्ह्यातही कोणी ओळखत नसते. या गोष्टीमुळे कार्यकर्त्यांना काही फरक पडत नाही. ते आपले उत्साहाने भावी मुख्यमंत्री म्हणून उमेदवाराचे बॅनर लावत असतात. अर्थात या बॅनरचा खर्च पण त्या उमेदवाराने किंवा त्या आमदारानेच केलेला असतो यात शंका नाही.

आपल्या उमेदवाराचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर लावणार्या एखाद्या कार्यकर्त्याशी संवाद साधला तर तो अत्यंत सोपे गणित मांडतो. असा कोणीही मुख्यमंत्री होण्यासाठी सर्वात महत्त्वाचे असते ते म्हणजे विधानसभांचे निकाल त्रिशंकू येणे. हा कार्यकर्ता तुम्हाला पटवून सांगेल की, या वेळेला मजबूत अशी सत्ता कोणाची येणार नाही आणि विधानसभा त्रिशंकू अवस्थेत लोंबकळत राहील. अशावेळी आमच्या साहेबांना मानणारा एक गट राज्यामध्ये आहे. तोच सत्ता स्थापन करण्याची शक्यता आहे आणि साहेबांचा गट जर सत्तेत आला तर साहेब मुख्यमंत्री होणार हे निश्चित आहे. बघा किती सोपे आहे नाही! यासाठी केवळ आपल्या उमेदवारावर प्रेम असावे लागते. त्याच्यासोबत आर्थिक हितसंबंध असावे लागतात आणि वातावरणनिर्मिती करण्याचे कौशल्य असावे लागते. मोठ्या पक्षांचेच नव्हे तर अगदी काही अपक्षही स्वतःचा भावी मुख्यमंत्री म्हणून प्रचार करत आहेत हे महाराष्ट्राच्या राजकीय प्रगल्भतेचे लक्षण आहे, असे म्हणावे लागेल. मुख्यमंत्री पदासाठी लायक असे किमान दीडशे लोक ज्या राज्यामध्ये आहेत ते राज्य पुढील काळात देशाचे नेतृत्व केल्यावाचून राहणार नाही.

विधानसभा निवडणुका होऊन जो काय निकाल लागायचा तो लागेल आणि जो कोणी व्हायचा तो मुख्यमंत्री होईल. तूर्त आपण आपल्या शहरामध्ये बॅनरवर असणार्या भावी मुख्यमंत्री यांची यादी करून ठेवलेले बरे राहील असे वाटते.

# शहरात इंटरनेट केबल्सचे अनिर्बंध जाळे बनले धोकादायक

## महापालिकेने त्वरित उपाययोजना करण्याची गरज

अमरावती शहरात विविध इंटरनेट प्रदात्यांनी शहरभर लावलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्समुळे शहरात वेगळीच समस्या समोर आली आहे. केबल्स वारंवार तुटून फुटपाथवर, रस्त्यांवर पडल्या आहेत, ज्यामुळे असंख्य पादचाऱ्यांना, वाहनचालकांना दुखापत झाली आहे. गंभीर अपघात होण्याआधी महापालिकेने यावर त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे.केवळ खड्डेच नाहीत, लेन शिस्तीचा अभाव आणि वाहतूक कोंडी यामुळे अमरावतीचे रस्ते असुरक्षित झाले आहेत. आता लटकणाऱ्या ऑप्टिकल फायबर केबल्स तितक्याच धोकादायक ठरत आहेत. पोलिसांच्या दप्तरी नोंद असलेल्या अशा अपघातांची आकडेवारी जर समोर आली, तर त्याची गंभीरता अनेकांना लक्षात येईल.शहर इंटरनेट आणि डेटा कनेक्टिव्हिटी वाढवत असल्याने, या डिजिटल क्रांतीचा अनुभव एक वेगळाच प्रश्न समोर घेऊन आला आहे. लटकलेल्या केबल्स आणि तारा पडण्याच्या धोक्यात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, ज्यामुळे पादचारी आणि वाहनचालक दोघांनाही गंभीर धोका निर्माण झाला आहे.काळ्या केबल्स रात्रीच्या वेळी किंवा पावसामुळे



दृश्यमानतेच्या खराब स्थितीत जवळजवळ अदृश्य असतात. त्यामुळे वाहन चालकांसमोरील धोका वाढला आहे.शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर झाडांवर लटकणारे आणि पथदिव्यांवर लटकणारे तारांचे जाळे हे एक सामान्य दृश्य आहे. कायद्यानुसार, कोणत्याही रस्त्यावर लोंबकळणा-या केबल्स नसाव्यात, पण, याकडे साफ दुर्लक्ष केले जात आहे. दुचाकीस्वारांसाठी हा एक मोठा धोका बनला आहे. या केबल्स शहराला कुरूप बनवत आहेत. फायबर केबलचे मीटर रस्त्यावर, विजेच्या खांबांवर आणि अगदी झाडांभोवती लटकलेले दिसतात. अनेकांना झाडाच्या सावलीमुळे केबल दिसत नाही आणि अपघात होत आहेत.अनेक ठिकाणी केबल तुटून अपघात होण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगामध्ये संपूर्ण जग हातामध्ये झाले आहे. इंटरनेटच्या सुविधा जास्तीत-जास्त जलद देण्यासाठी विविध कंपन्यांमध्ये चढाओढ लागली आहे. त्यामध्ये आता फायबर केबलचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्याच्या विपरीत परिणाम सर्वत्र झाडावर, खांबावर मिळेल त्या जागेवर केबल अडकवून कनेक्शन देण्यात येत असल्याने धोका वाढत चालला आहे.इंटरनेट कनेक्शन च्या अनेक ठिकाणच्या केबल तुटून अपघात होण्याचे प्रकार वाढत चालले आहे. तेव्हा वाढते केबलचे जाळे रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने ठोस उपाय-योजना राबवाव्यात. त्यामध्ये सध्या फायबर केबलद्वारे कमी खर्चात जादा स्पीड असलेले इंटरनेट देण्यासाठी विविध कंपन्यांमध्ये अशरक्षः चढाओढ लागली आहे. तसेच दिवसेंदिवस इंटरनेटची सुविधा घेणाऱ्याची संख्या वाढत चालली आहे. एखाद्याने नेट कनेक्शनची मागणी केल्यास संबंधित कंपनीचे कर्मचारी मिळेल त्या जागेवर, झाडावरुन, विद्यूत खांबावरुन केबल टाकून देतात, अशा वाढत्या मागणीमुळे शहरातील विविध लहान-मोठ्या रस्त्यावर फायबर केबलचे जाळे दिसून येत आहे. संबंधित कंपन्याकडून केबल वायर टाकताना कोणतीही अटी-नियम नसल्याने मनाला पटेल तशा पद्धतीने केबल टाकलेल्या दिसून येत आहे. याचा नाहक त्रास नागरिकांना तसेच वाहनधारकांना सोसावा लागत आहे. याबाबत महानगरपालिका प्रशासनाने तातडीने याबाबत कडक धोरण राबवावे.



**नितीन देशमुख**
माजी नगरसेवक, अमरावती.

# पिकांतील कीड व रोग नियंत्रणासाठी टॉप फाइव मित्र बुरशी कोणत्या?

**विदर्भ प्रजासत्ताक –** बुरशी म्हटले की नुकसान म्हणजे पिकांची नासाडी हे चित्र आपल्या समोर दिसतं. परंतु काही बुरशी या आपल्या फायद्याच्या असतात. आपल्या मातीत बुरशीच्या अनेक प्रजाती आढळतात, यात दोन प्रकारच्या बुरशी असतात.त्यात एक म्हणजे (शत्रू बुरशी) ही हानिकारक असते तर काही प्रजाती फायद्याच्या (मित्र बुरशी) देखील असतात. ह्या बुरशी बहुतेकवेळा सेंद्रिय अवशेषांवर आढळते. म्हणूनच,जमिनीत बुरशीचे माध्यमातून होणाऱ्या अनेक प्रकारच्या पिकाच्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी हे एक महत्त्वपूर्ण बुरशी आहे.

**१) मेटॅरायझियम**

ह्या बुरशीला ग्रीन मस्कार्डीन बुरशी असेही म्हणतात. ही बुरशी मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी, बोंडअळी, हुमणी इत्यादी किडीच्या अंगावर वाढते व त्या किडींना नष्ट करते. फवारणीकरीता ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळुन फवारणीकरीता वापर करता येतो.




**२) बिव्हेरीया**

या बुरशीला व्हाईट मस्कार्डीन बुरशी असेही म्हणतात. हा रोग बोंडअळी, पाने खाणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, खोडकीडा, विविध भुंग इत्यादी किडीच्या अंगावर बुरशी वाढुन पांढऱ्या रंगाची पावडर तयार होते या किडीचा नाश होतो. यालाच व्हाईट मस्कार्डीन असे म्हणतात.

**३) नोम्युरीया**

या बुरशीमुळे पंतगवर्गीय, बोंडअळी, उंटअळी, पाने खाणारी अळी या किडीवर बुरशी वाढून ग्रिन मस्कार्डीन हा रोग होऊन किडीचे नियंत्रण होते.

**४) व्हर्टिसीलीयम**

रस शोषणाऱ्या किडीच्या नियंत्रणाकरीता या बुरशीचा वापर करतात. ही बुरशी मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे, पाने खाणारी अळी इत्यादी किडीच्या अंगावर वाढुन किडींना रोगग्रस्त करुन किड नियंत्रण होते.

**५) ट्रायकोडर्मा**

ही बुरशी जमीनीमधुन होणाऱ्या रोगाच्या नियंत्रणाकरीता अतिशय उपयुक्त असुन जमीनीत असणाऱ्या अपायकारक बुरशींना मारण्याचे काम करते. तसेच बिजप्रक्रिया करण्याकरीता ह्या बुरशीचा उपयोग होतो. बायोमॉस कुजविण्याच्या प्रक्रियेत ह्या बुरशीचा उपयोग डिकंपोझर म्हणुनही करता येतो.




# टाळा कॅफिनचा अतिरेक

**विदर्भ प्रजासत्ताक**

सकाळी पांघरुणात लोळतच एक कप गरम गरम चहा मिळाला, तर त्याच्यासारखा दुसरा आनंद नाही. पण, कुठलीही गोष्ट प्रमाणात करणे, हेच आरोग्याच्या दृष्टीने चांगले असते. एखाद-दुसरा चहाचा कप घेणं इथपर्यंत ठीक आहे; पण काही लोक दिवसातून चार-सहा कप चहा किंवा कॉफी पिणे पसंत करतात. त्यांना असे वाटते की, यामुळे त्यांचा मेंदू तरतरीत होतो आणि विचार करण्यासाठी उत्साह मिळतो. या समजुतीमुळे हळूहळू अशा व्यक्ती चहा- कॉफीच्या अधीन होतात. सकाळी सुस्ती जाण्यासाठी चहा हवा, दुपारच्या वेळी कंटाळवाणे वाटू नये म्हणून चहा हवा आणि संध्याकाळी तर चहा हवाच. म्हणजे जणू आपण चहा पिण्याचे वेगवेगळे बहाणेच शोधून काढले आहेत.



कॅफिनचे रासायनिक नाव आहे, टिमिथीलक्सेन्थाइन. कॅफिनचे शुद्ध रूप हे पांढर्या रंगाचे आणि चवीला कडू असणार्या पावडरीच्या रूपात असते. ही पावडर स्वाद वाढवण्यासाठी सॉफ्ट ड्रिंक्समध्येही टाकतात. बर्याचशा पानांमध्ये, फळांमध्ये आणि बिन्समध्ये नैसर्गिक रूपात कॅफिन आढळते. आपण कॅफिनयुक्त ड्रिंक्स किंवा चहा-कॉफी घेतो त्या वेळी रक्ताची गती वाढते. याच कारणामुळे आपल्याला आतून खूप ऊर्जायुक्त, उत्साही वाटू लागते. गमतीची गोष्ट म्हणजे कॅफिनचा परिणाम शरीरावर केवळ पाच-सहा तासांपर्यंतच राहतो. त्यानंतर ज्यावेळी हार्मोन्सचे प्रमाण पूर्ववत होते, तेव्हा तुम्ही आळस आणि झोपेच्या भावनेने ग्रासले जातात. तेव्हा आपल्याला पुन्हा चहाची गरज पडते. ही सवय हळूहळू वाढत जाऊन तुम्ही सतत चहा किंवा कॉफी पिऊ लागता आणि अशा प्रकारे त्यामुळे आपण कॅफिनवर निर्भर होत जाऊ लागतो.

कॅफिनचे प्रमाण शरीरात कोर्टीसोल (स्टिरॉईड हार्मोन्स)चे प्रमाण वाढवते. यामुळे शरीरात आरोग्यासंबंधीच्या बर्या प्रकारच्या तक्रारी निर्माण होतात. यामध्ये हृदयाशी संबंधित त्रास, मधुमेह, अनियमितता आणि वजन वाढण्याच्या तक्रारींचा समावेश आहे. बरेचदा वेदना निवारण्यासाठी कॅफिनयुक्त पदार्थ खाल्ले किंवा पिले जातात. यामुळे डोकेदुखी, थकवा, मूड बदलणे म्हणजे निराशा किंवा गळून गेल्यासारखे वाटणे, एकाग्रतेत कमतरता येणे, भूक कमी लागणे, भ्रम होणे, स्मरणशक्ती कमी होणे, रक्तदाब वाढणे किंवा कमी होणे, ताप इत्यादी त्रास निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळीच कॅफिनच्या विळख्यातून बाहेर पडणे, यातच आरोग्यहित आहे.

# अचलपूर परिसरात पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन

## पाच कुख्यात हिस्ट्रीशिटर आरोपींना अटक

### मध्यरात्री संशयित अवस्थेत फिरतांना मिळाले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अचलपूर** अचलपूर शहरात गणेशोत्सवा दरम्यान राडा झाल्यानंतर एसपी विशाल आनंद यांनी एलसीबीच्या पथकाला अचलपुर डिव्हीजनमध्ये कोम्बींग ऑपरेशन राबविण्याचे आदेश दिले. त्यानुसार एलसीबीने परतवाडा, अचलपुर व सरमसपुरा पोलिसांच्यासह मिळून मध्यरात्री जम्बो कोबिंग ऑपरेशन राबवून पाच कुख्यात हिस्ट्रीशिटर आरोपींना अटक केली. पाचही आरोपी वेगवेगळ्या भागात आपली ओळख लपवून संशयीतरित्या फिरतांना मिळून आले.सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पकडल्या गेलेल्या आरोपींची नावे प्रमोदकुमार चिरंजीलाल पुरोहित, रा.हीरापुर, दादाराव साबन वानखडे, रा. मेहराबपुरा अशी आहेत. तर परतवाडा पोलिसठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नरेश फुलचंद झारखंडे (२८), रा. येणी पांढरी, कार्तिक प्रभाकर शिंपी (१९) रा.



परतवाडाअनिकेतराजु नाहारकर (२४) रा. परतवाडा यांचा समावेश आहे. पाचही आरोपी मध्यरात्रीच्या सुमारास आपआपली ओळख लपवून संशयीतरित्या फिरतांना मिळून आले. सर्व आरोपींवर पोलिस ठाण्यात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमे दरम्यान फरार पाहिजे असलेले गुन्हार, जैल रिलिज आरोपी, ऑर्म्स ॲक्टचे आरोपी, टॉप-१० गुन्हेगार, अमंली पदार्थ बाळणारे, स्टॅंडींग वॉरन्टच्या आरोपींना सुध्दा चेक करण्यात आले.

# रब्बी हंगामासाठी किती खतांची उपलब्धता? कोणते खत पडणार कमी?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती –** शेतकऱ्यांनी रब्बी पिकांच्या पेरण्यांची तयारी सुरू केली आहे. मूग, उडीद, बाजरी, सोयाबीन पिकांची काढणी सुरूवात झाल्यामुळे रब्बीच्या पेरण्या तोंडावर आल्या आहेत. बियाण्यांसोबत शेतकरी खतांचीही पेरणी करत असतात. त्याामुळे सध्या राज्यामध्ये खतांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. खरीप आणि रब्बीच्या हंगामासाठी केंद्र सरकार प्रत्येक राज्यासाठी खतांचा कोटा मंजूर करत असते.

दरम्यान, कृषी आयुक्तालयाने मागणी केलेल्या खतांपेक्षा कमी खत केंद्र सरकारकडून मंजूर करण्यात आल्याची माहिती आहे. युरिया, डीएपी आणि पोटॅश या खतांच्या मागणीपेक्षा कमी मंजुरी केंद्र सरकारकडून मिळाली आहे. त्यामुळे या रब्बी हंगामात या खतांची कमतरता भासू शकते. तर ही मंजुरी २० सप्टेंबर पर्यंतची असून अजूनही या कोट्यामध्ये वाढ करण्याची



शक्यता वर्तवली जात आहे. तर २० सप्टेंबरपर्यंत एकूण अपेक्षित खतांच्या तुलनेत ६० टक्के खतांचा पुरवठा केंद्राकडून करण्यात आला आहे. राज्यासाठी युरिया १० लाख टन, डीएपी २.५ लाख टन, म्युरेट ऑफ पोटॅश १ लाख टन, मिश्र खते १२ लाख टन, सिंगल सुपर फॉस्फेट ६ लाख टन असे मिळून एकूण ३१ लाख ५० हजार टन खतांना मंजूरी मिळाली आहे. त्याचबरोबर नॅनो युरियाच्या ३४ लाख ७० हजार बाटल्या आणि डीएपीच्या ११ लाख बाटल्या केंद्र सरकारकडून यंदाच्या रब्बी हंगामात मंजूर करण्यात आल्या आहेत. तर ३ लाख टन मागणी असलेल्या डीएपीला २ लाख ५० हजार टनांची मंजुरी दिल्यामुळे या खताची कमतरता भासण्याची शक्यता आहे.

**भेसळयुक्त खतांपासून सावधान!**

खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांची भेसळयुक्त खते आणि बोगस बियाणांचा पुरवठा करून फसवणूक केली जाते. तेलंगणा, मध्यप्रदेश, कर्नाटक आणि गुजरातमधून मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त खते महाराष्ट्रात छुप्या मार्गाने येतात. अनेकदा खतांमध्ये माती मिसळल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी खते खरेदी करताना खात्रीशीर विक्रेत्याकडून घेतली पाहिजेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ | शहर/ग्रामिण


# अमरावती जिल्ह्यात जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत १८० शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

सातत्याने दरवर्षी येणारी नैसर्गिक आपत्ती, शेतीतील घटणारे उत्पादन, शेतमालाला मिळणारा कमी दर यामुळे वाढलेली कर्जफेडीची चिंता, अतिवृष्टी, सततचा पाऊस व आर्थिक अडचण जून त्यामुळे आलेले नैराश्य यामुळे जिल्ह्यात ऐन खरीप हंगामाच्या साडेतीन महिन्यांत ५५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. जूनमध्ये १८, जुलैमध्ये १९, ऑगस्टमध्ये १८ आत्महत्या झाल्या.



**जिल्ह्यातील महिनानिहाय आत्महतेची आकडेवारी**

| | |
|---|---|
| जानेवारी | – २२ |
| फेब्रुवारी | – २६ |
| मार्च | – ३५ |
| एप्रिल | – २२ |
| मे | – २० |
| जून | – १८ |
| जुलै | – १९ |
| ऑगस्ट | – १८ |

२०२४ चा खरीप हंगाम अर्धा संपला आहे. यात मूग, उडीद, सोयाबीन ही पिके पूर्णतः हातून गेली. आता कपाशी व तूर पीक तेवढे बाकी आहे. ही दोन्ही पिके आजच ६० टक्के हातून गेल्यातच जमा आहेत. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. अशातच जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत जिल्ह्यात १८० शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे तालुक्याचे धगधगते वास्तव आहे. यात सप्टेंबरमध्ये झालेल्या शेतकरी आत्महत्यांचा समावेश नाही.

कलर बॉक्स

### जिल्ह्यात १८० पैकी फक्त ६५ आत्महत्या मदतीस पात्र

जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत जिल्ह्यात १८० शेतकरी आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत. यापैकी फक्त ६५ आत्महत्या शासनाच्या मदतीस पात्र ठरविण्यात आल्या.

पात्रपैकी ४९ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत देण्यात आली आहे. आत्महत्येची ८२ प्रकरणे प्रलंबित आहेत, तर ३३ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णय

# झेडपी डेप्युटी सीईओंसह ५ बिडीओंची बदली

## सहा नविन बिडीओ मिळाले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**


आगामी निवडणुकीच्या विधानसभा पार्श्वभुमिवर जिल्हा परिषदेचे स्वच्छ भारत मिशन व पाणी पुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह पाच गटविकास अधिकाऱ्यांची जिल्हाबाहेर बदली करण्यात आली आहे. त्या ऐवजी जिल्ह्याला सहा नविन गटविकास अधिकारी मिळाले आहेत.




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर सर्वच विभांगात बदल्यांची श्रृंखला सुरू असताना जिल्हा परिषदेत देखील गूरूवारी एका उपमुख्य कायकारी अधिकारी यांच्यासह बिडीओंच्या बदल्यांचे आदेश धडकले. यामध्ये स्वच्छ भारत अभियानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी, धारणी येथील गटविकास अधिकारी बि.एस. रायबोले, अंजनगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारीविनोदखेडकर, भातकुलीचेप्रफुल भोरखडे, धामणगाव पंचायत समितीच्या माया वानखडे यांची जिल्हाबाहेर बदली करण्यात आली आहे. त्याऐवजी धारणी येथे यु.जे. कुसुरकर, चिखलदरा येथे एस.डी. भारसाकडे, दर्यापुर येथे ईशाधिन शेळकंदे, अंजनगाव सुर्जी येथे एस.एल खातळे, अमरावती पंचायत समितीला एस.बी तुपे, धामणगाव रेल्वेला एम.एस पाटील असे सहा बिडीओंची नियुक्ती मिळाली आहे. मात्र अद्यापही जिल्ह्यात बिडीओ तसेच तीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी व खातेप्रमुखांची पदे रिक्त आहेत. ते या निवडणुकीपुर्वी मिळण्याची आशा आता पल्लवित झाली आहे.

# नवरात्री यात्रेत दुतर्फा १३ स्वागत गेट उभारणार, ३० सप्टेंबरला मनपात स्वागत गेटचे लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** – महानगरपालिके अमरावती मार्फत राजकमल चौक ते अंबादेवी मंदिर अंबागेट पर्यंत एकूण १३ स्वागत गेट रेखांकन करण्यात आले आहे. प्रत्येक स्वागत गेट करीता शासकीय आधार दर ११,२४२ रु. व १८% जीएसटी सह निश्चित करण्यात आली. सदर स्वागत गेट वितरीत करण्याबाबत धोरण ठरविण्या करीता सर्व राजकीय पक्षाचेप्रतिनिधी व नागरिक उपस्थितहोते. सर्व विचार विनिमय अंती प्रत्येक स्वागत गेट चे लिलाव करण्याबाबत, सर्वानुमते निश्चित करण्यात आले. त्यामुळे सदर १३ स्वागत गेट चे लिलाव ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात येणार आहे. तरी ज्यांना स्वागत गेट उभारायचे आहे त्यांनी लिलावामध्ये सहभाग नोंदवावा. ज्या स्वागत गेट स्पर्धा होणार नाही त्यांना शासकीय आधार मुल्य ११,२४२ रु. व१८% जीएसटी उपलब्ध करता येईल व सदर प्रक्रियेनंतर याबाबत कोणाचेही म्हणणे विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी असे डॉ. मेघना वासनकर उपायुक्त , अमरावती यांनी कळविले आहे.





# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्या

### शेतकऱ्यांसह शिवसेनेची तहसील व कृषी कार्यालयात धडक

## शिवसेनेचे प्रकाश मारोडकर यांनी पीक विमा अधिकाऱ्यावर उगारला हात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदानदेण्यातयावेवसरसकट पीकविमामंजूर करावा या मागणीसाठी शेकडो शेतकऱ्यांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात तहसील व कृषी कार्यालयात धडक दिली. तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांच्या टेबलवर सोयाबीनची झाडे टाकून सरकार विरोधात नारेबाजी करत विविध मागण्याचे निवेदन सादर केले.

सोयाबीनचे पीक अंतिम टप्प्यात असून नांदगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनवर येलो मोझ्याक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने हिरवीगार असलेली पाने पिवळी पडून पाने गळायला लागली आहे. तालुक्यातील हजारो हेक्टर सोयाबीन येलो मोझ्याक रोगाच्या विळख्यात सापडल्याने शेतकरी चितेत पडला आहे. आधीच सततच्या पावसाने अतिवृष्टी झाल्याने पिके वाढली नाही. त्यामुळे शेतातील झाडाला शेंगा कमी प्रमाणात लागल्या असल्याने उत्पादनात प्रचंड घट होणार आहे. तसेच पीकविमा धारक शेतकऱ्यांनी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी विमा कंपनीकडे करून एक महिन्याचा कालावधी होऊन सुद्धा नुकसानीची पाहणी नाही. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, सरसकट पीक विमा मंजूर करावा तसेच सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने आर्थिक अर्थसहाय्य योजने अंतर्गत आर्थिक

अंतर्गत आर्थिक मदतीच्या यादीत नावे नसलेल्या मात्र खरीप हंगाम २०२३ च्या ७/१२ वर पिकांची नोंद असलेल्या शेतकऱ्यांची नावे तलाठ्यांनि कृषी विभागाला सादर करण्याचे आदेश असतांना अनेक दिवसा पासून तलाठी टाळाटाळ करीत आहे, ही नावे तात्काळ नावे पाठवावी अन्यथा तलाठी कार्यलयाला ताला ठोकू असा इशारा देऊन निवेदन सादर केले. यावेळी शिवसेनेचे विधानसभा संघटक बाळासाहेब राणे, प्रकाश मारोटकर, विष्णुपंत तिरमारे , महिला आघाडीच्या अध्यक्षा छायाताई भारती सह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# मागेल त्याला सौर कृषी पंप योजना

## वऱ्हाडात तीन महिन्यात बसविण्यात आले २८६६ सौर कृषी पंप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना जाहीर झाल्यापासून वऱ्हाडात तीन महिन्यात २ हजार ८६६ शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषी पंप बसविण्यात आले असून २०,२८८ शेतकऱ्यांच्या अर्जावर काम सुरू आहे.शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेची माहिती देत या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणच्या नागपूर प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी केले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सरकारने यंदा २८ जून रोजी अर्थसंकल्पात 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही योजना शेतकऱ्यांसाठी जाहीर केली. त्यानुसार शेतकऱ्यांना केवळ १०% रक्कम भरून सौर पॅनेल्स, पंप असा संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांना ५% लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. बाकी रक्कम केंद्र सरकार व राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. या योजनेत वऱ्हाडात २३,१५४ अर्ज महावितरणकडे प्राप्त झाले असून त्यापैकी १२,५८७ शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम भरून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली आहे. तर २,८६६ शेतकऱ्यांच्या शेतात पंप बसविण्यात आले आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने शेतकऱ्यांना दिर्घ काळ या पंपाचा वापर करून सिंचन करता येईल. त्यांना विजेचे बिल येणार नाही तसेच त्यांना महावितरणच्या वीज पुरवठ्यावर अवलंबून रहावे लागणार नाही. दिवसा वीजनिर्मिती होत असल्याने सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा मिळावा ही शेतकऱ्यांची ईच्छा पूर्ण होणार आहे.



राज्यभरात या योजनेला शेतकऱ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला आहे. राज्यात एकूण १० लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार असल्याने या योजनेमुळे शेतकऱ्यांची पेड पेंडिंगची समस्या संपूर्णपणे सोडविण्याची संधी निर्माण झाली आहे.मागेल त्याला कृषी पंप योजनेत बुलढाणा जिल्ह्यातून सर्वाधिक ७,३८४ अर्ज प्राप्त झाले असून त्या खालोखाल यवतमाळ (५,९८१ अर्ज), वाशिम (४,६५२), अकोला (३,८९० ) , आणि अमरावती (१,२४७ ), जिल्ह्यांचा क्रम लागतो. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे सामान्य शेतकऱ्यांना ९०% तर अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमातीमधील शेतक–यांना ९५% सबसिडी सह तात्काळ सौर कृषी पंप मिळत आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महावितरण च्या वेबसाइटवर जाऊन संबंधित पर्याय निवडून नोंदणी करता येते. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन व सोपी करण्यात आली आहे.

# सेमाडोह चावला ट्रॅव्हल्स अपघात जखमी शिक्षक पवारांचा उपचारादरम्यान मृत्यू

## अपघातीमधील मृतकांची संख्या पाचवर

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७ अमरावती** ग्राम सेमाडोह येथे खाजगी ट्रॅव्हल्सक्र चझ १२६१५५५ चाघाट वळणावर खोल नाल्यात कोसळून अपघात झाला होता. या अपघातातील जखमी शिक्षक मनोहर पवार वय ४५ वर्ष रा. मनोहर कांडली यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातील मृतकांची संख्या पाचवर पोहोचली आहे.शिक्षक मनोहर पवार हे स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा तालुका धारणी येथे सेवारत होते. या अपघातात ते जखमी झाले. गुरुवार २६ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांना अमरावतीमधील एका खासगी रुग्णालयातून हैदराबाद – येथे पुढील उपचारासाठी नेत असताना रस्त्यामध्येच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह वसंतराव वैद्यकीयमहाविद्यालय यवतमाळ येथे पोस्टमार्टम करिता ठेवण्यात आले आहे. शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४ रोजी पोस्टमार्टम होऊन त्यांचे मुळगाव ग्राम चांगापुर ता. आर्णी जि. यवतमाळ येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.



# चांदुर बाजारात चोऱ्यांचे प्रमाण वाढले, एकाच रात्री तीन घरात चोरीचा प्रयत्न

## रोख,दागीण्यांसह चोरट्यांनी जेवणही केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चांदुर बाजार**

चांदूरबाजारात सध्या चोरी व घरफोडीच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली.गेल्या आठवड्यात गवळी पुर्यातील क्वालीटी चिकन दुकान व घरातील १ लाखाच्या घरफोडीची शाई वाळते न वाळते तर दोन दिवसापुर्वी चांदूरबाजारात एकाच रात्री तीन घरांना अज्ञात चोरट्यांनी लक्ष केले.रात्रीला पोलीसांची गस्त असतांना शहर व परिसरात चोरीच्या घटना सतत घडणे याने शहर बीट व पोलीस प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चांदूरबाजारातील आनंदनगर,छत्रपतीनगर परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री तीन घरांना निशाना बनविले. ज्यात पहिल्या चोरीच्या घटनेची माहीती सौ मिना विजय ठाकरे यांना त्यांच्या कॉलनीत राहणार्या रविंद्र चौधरी यांनी फोन वर दिली. घर मालक आपले नातेवाईकांकडे मांगलीक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते.घराला कुलुप लागल्याचे दिसताच चोरट्यांनी घराचा मागील दरवाजा उघडून घरात प्रवेश करुन चोरीच्या घटनेला अंतिम स्वरुप दिले.यात चोरट्यांनी रोख राशी ५०००रुपये तथा ६ ग्रॅम सुवर्ण आभुषण चोरांनी लंपास केले.इतकेच करुन चोरटे थांबले नाही तर त्यांनी घरातील शिजलेल्या अन्नातून जेवणही घेतल्याचे घटनास्थळावर दिसले. दुसर्या घटनेत सुरेन्द्र दवे यांचा परीवार काका च्या घरी अंतीम संस्कार कार्यक्रमात गेले होते.याची संधी साधून चोरट्यांनी या घरालाही आपले लक्ष करुन घरातील साहित्य लंपास केले.तर घर मालकाच्या घरातील अलमारीत ठेवलेले दागीने व रोख राशी चोरट्यांच्या नजरेतुन सुटली.तर तिसर्या घटनेत चोरट्यांनी अजाबराव मोहीते यांची बजाज डिस्कवर लाल रंगाची क्रमांक चक३५–द०१७८ बाईक लंपास केली.याची तक्रार घर मालकांनी चादुर बाजार ठाण्यात केली असून पोलीसांनी ३३१, ३०५ बीएनएस अन्वये अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करुन ठाणेदार सुरज बोंडे यांचे मार्गदर्शनात प्रकरणाची चौकशी सुरु आहे.



### चिमुकल्यांच्या खाऊच्या पैशावरही मारला ताव

चांदुर बाजार मधील छत्रपती नगर निवाशी सुरेन्द्र दवे यांच्या बालकाने आपल्या गल्लयात सुमारे अडीच हजाराच्या दरम्यान जमा केलेली रोख राशीवरही या चोरट्यांनी हात साफ केला तर बालकाच्या वाढदिवसानिमित्त भेट स्वरुपात मिळालेळी सोन्याची आंगठी, पेन्डालआदी लहान,लहान सोन्याचे आभुषण ज्याचे वजन सुमारे चार ते पांच ग्राम असल्याचे सांगीतले जात आहे.ती रोख राशी चोरुन नेली.

# नागपुरकरांचे 'लख-लखते' पुणेरी प्रेम; महिनाभरात पुणे गाठणारांची संख्या एक लाखावर!

## छत्रपती संभाजीनगरला जाणाऱ्यांचीही संख्या लक्षणीय : खासगी बस रोजच हाऊसफूल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ नागपूर –** देशभरातील नागरिकांचे मायानगरी मुंबईवरील प्रेम सर्वश्रूत आहे. सक्रीनवर चमकण्यासाठी, रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी आणि अशाच दुसऱ्या कोणत्या कारणाने देशातील कानाकोपऱ्यातून रोज मोठ्या प्रमाणावर नागरिक मुंबईत दाखल होतात. नागपूरकर मंडळी मात्र मुंबईसोबतच पुण्यावरही लाखमोलाचे प्रेम करतात. होय, महिनाभरात एक लाखावर नागपूरकर पुणे गाठतात. खासगी बस प्रवाशांच्या संख्येतून हे स्पष्ट झाले आहे.महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. मात्र, पुण्याला राज्याची सांस्कृतिक राजधानी मानली जाते. एज्युकेशन हब आणि रोजगाराच्या मोठ्या संधी असल्याने ठिकठिकाणची मंडळी पुण्यात स्थिरावली आहे. नागपूर-विदर्भातील मोठ्या संख्येत विद्यार्थी पुण्याला शिकायला अन् नोकरीच्या निमित्ताने राहतात.




त्यानिमित्ताने त्यांचे तात्पुरते वास्तव्य असले तरी या मंडळीपैकी अनेक जण रोज आपल्या गाव, घर अन् नातेवाईकाला भेटण्यासाठी नागपूर-विदर्भात जात येत असतात. त्यात ट्रॅव्हल्सने येणारा-जाणारांची संख्या मोठी आहे.खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या नागपुरात एकूण ३०० ट्रॅव्हल्स आहेत. त्या महाराष्ट्रातील जवळपास बहुतांश मोठ्या शहरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड तसेच आंध्र प्रदेशमधील विविध शहरात प्रवाशांची ने-आण करतात. यातील सर्वाधिक ९० बसेस पुण्यासाठी धावतात आणि ३६ सिटर असलेली प्रत्येक बस अपवाद वगळता रोजच पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांनी खच्चून भरलेली असते.

अर्थात रोजचा हिशेब केल्यास नागपुरातून खासगी बसने पुण्याला रोज ३२४० प्रवासी जातात. महिन्याची प्रवाशांची ती संख्या ९७ हजारांवर जाते. सणोत्सवाच्या दिवसांचा विचार केल्यास हा आकडा लाखांवर जातो. या आकडेवारीतून नागपूरकरांचे लखलखते पुणेरी प्रेम अधोरेखित होते. पुण्याचे नियमित ट्रॅव्हल्सचे तिकिट १२०० ते १५०० दरम्यान असते. तर, उन्हाळ्यात आणि सणोत्सवाच्या दिवसांत ते २००० च्या घरात जाते.

### छत्रपती संभाजीनगरालाही जाणाऱ्यांची संख्या मोठी

नागपुरातून खासगी बसने छत्रपती संभाजीनगरला जाणाऱ्या प्रवाशांचीही संख्या मोठी आहे. संभाजीनगरसाठी नागपूरहून रोज २५ बसेस सुटतात. बसमधील ३६ पैकी ३० सिट जवळपास रोजच पॅक असतात. अर्थात महिन्याला २२ ते २५ हजार प्रवासी संभाजीनगरला जातात.

### नाशिक, मुंबई, इंदोर अन् हैदराबाद बसमध्येही गर्दी

मुंबईला रोज १० बसेस जातात आणि नागपूरहून रोज मायानगरीत जाणारांची संख्या ३०० ते ४०० च्या घरात आहे. नाशिक १५ बसेस आणि प्रवाशांची संख्या ४०० ते ५००, हैदराबाद रोज ६५ बसेस आणि प्रवाशी संख्या १९०० ते २०००, इंदोर १५ बसेस आणि प्रवाशी संख्या ४०० ते ५०० एवढी आहे.

# अमित शहा घेणार मुंबईसह कोकणातील जागांचा आढावा

## पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी साधणार संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई –** विदर्भासह मराठवाड्यातील पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर आता मुंबईतील जागांचा आढावा आणि पदाधिकारी संवादासाठी ज्येष्ठ भाजप नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या मुंबई दौर्यावर येत आहेत. १ आणि २ ऑक्टोबरच्या या दौर्यात मुंबईसह मुंबई महानगर आणि कोकणातील विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला जाईल.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहा यांनी सध्या निवडणूक तयारीच्या आढाव्यासोबतच कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. १ ऑक्टोबरला दादर येथील योगी सभागृहात शहा हे मुंबईतील सर्व ३६ विधानसभा मतदारसंघांतील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत संवाद साधणार आहेत.



### महायुतीतील नेत्यांशीही चर्चा

या दौर्यात शहा हे महायुतीच्या नेत्यांसोबतही चर्चा करणार आहेत. या बैठकीत महायुतीच्या जागावाटपावर अंतिम चर्चा होण्याची शक्यता आहे. यावेळी जागावाटपासह पहिल्या टप्प्यातील उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. शहा यांच्या दौर्याच्या नियोजनासाठी भाजप प्रदेश कार्यालयात राज्याचे प्रभारी आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. मुंबईतील कार्यक्रमांच्या तयारीचा आढावा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड आदी नेते घेणार आहेत.

# शेतमजूर, कामगारांच्या किमान वेतनात वाढ

## किमान वेतनाची अंमलबजावणी करणे बंधनकारक

### केंद्र सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नवी दिल्ली–** कृषी क्षेत्रासह औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या किमान वेतनात वाढ करण्याचा निर्णय गुरुवारी केंद्र सरकारने घेतला. ही वाढ कौशल्ये आणि क्षेत्रानुसार भिन्न आहे.

केंद्रीय श्रम आयुक्तांनी यासंबंधीची अधिसूचना जारी केला असून वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या किमान वेतनात वाढ करण्यात आल्याचे अधिसूचनेत म्हटले आहे. किमान वेतन कायदा १९४८ अन्वये केंद्र आणि राज्य सरकारे अशा दोघांनाही आपापल्या अखत्यारीतील क्षेत्रातील कामगारांचे किमान वेतन ठरविण्याचा अथवा त्यात सुधारणा करण्याचा अधिकार आहे.



बांधकाम मजूर, मालाची चढ-उतर करणारे कामगार, सुरक्षा रक्षक, चौकीदार, घरगुती कामगार, खाण कामगार आणि शेतमजूर यांना याचा लाभ होणार आहे. याआधीची किमान वेतनातील वाढ यंदा एप्रिलमध्ये करण्यात आली होती. किमान वेतनाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

### रोज किती मिळावे, महिन्याला किती असावे?

बांधकाम, स्वच्छता, सफाई, माल चढ-उतार क्षेत्रातील अकुशल कामगारांचे किमान वेतन आता ७८३ प्रति दिन अथवा २०,३५८ रुपये प्रतिमहिना (जे अधिक असेल ते). अर्धकुशल कामगारांसाठी ते ८६८ रुपये प्रतिदिन अथवा २२,५६३ रुपये प्रतिमहिना. लिपिक आणि निशस्त्र सुरक्षा रक्षकांसाठी ते ९५४ रुपये प्रतिदिन अथवा २४,८०४ रुपये प्रतिमहिना. सशस्त्र सुरक्षा रक्षकांसाठी किमान वेतन १,०३५ रुपये अथवा २६,९१० रुपये प्रतिमाह निश्चित करण्यात आले आहे.

## राज्यसेवा परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर

# नागपूरची वैष्णवी बावस्कर मुलींमध्ये अव्वल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर :** राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२३ची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली असून नागपूरच्या वैष्णवी हरिभाऊ बावस्कर यांनी मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावला आहे. पालघरच्या अमित मोतीराम भोये यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गातून चौथा क्रमांक मिळविला आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २०२३ साली गट अ आणि गट ब दर्जाच्या ३०३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली होती. त्याची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. ही यादी तात्पुरत्या स्वरूपाची आहे. उमेदवारांना लवकरच पदांचे पसंतीक्रम ऑनलाईन सादर करण्याची




सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. विविध न्यायालयात, न्यायधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. वैद्याकीय अहवाल विचारात घेऊन उमेदवारांना लवकरच पदांचे पसंतीक्रम ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. वैष्णवी बावस्कर यांची सहा महिन्यांपूर्वी मंत्रालयातील गृह विभागात सहाय्यक कक्ष अधिकारी पदावर निवड झाली होती. गुरुवारी जाहीर झालेल्या एमपीएससी परीक्षेतही त्यांनी बाजी मारली असून आता त्यांची उपजिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली आहे.

# अजित पवार महायुतीतून बाहेर पडतील

### आमदार बच्चू कडू यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण, म्हणाले दादा महाशक्तीसोबत येतील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७अमरावती–** राज्याच्या राजकारणात सध्या असे चित्र आहे की अजित पवार महायुतीमधून बाहेर पडतील, असे वक्तव्य आमदार बच्चू कडू यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तर अजित पवार आमच्यात येऊन महाशक्ती तयार होईल असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात युती आघाडीत मोठी फाटाफुट होईल असे चित्र सध्या दिसून येत आहे. जर अजित पवार महायुतीमधून बाहेर पडले तरच त्यांना जागा मिळतील, अन्यथा त्यांना जागा मिळणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे.



अजितदादांबाबत समिती निर्णय घेईल

बच्चू कडू म्हणाले की, अजित पवार बाहेर पडले आणि आमच्यासोबत त्यांना यायचे असेल तर त्याबद्दलचा निर्णय आमची सुकाणू समिती घेईल. ते महायुतीमधून बाहेर पडतील असे काही संकेत आहेत. जशी तुमची सूत्र असतात तशी आमचेही सूत्र असतात, असे कडूंनी म्हटले आहे.

# विठ्ठल-रुक्मिणीच्या पूजेसाठी एक ऑक्टोबरपासून ऑनलाईन नोंदणी

## नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशीपूजा, चंदनउटी पूजेचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७पंढरपूर –** श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशीपूजा, चंदनउटी पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून दिली आहे. या पूजेची नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली आहे. भाविकांना आता एक ऑक्टोबरपासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी करता येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. मंदिर समितीच्या २० ऑगस्टच्या सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत हा निर्णय घेतला होता. ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या संकेतस्थळावर करता येईल.




दि. ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशी श्री विठ्ठलाच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाईन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधण्याचे आवाहनही शेळके यांनी केले आहे.

# एसटी बस अस्वच्छ अनेक बसेसमध्ये पान, गुटखाच्या पिचकाऱ्या, प्रवाशांना मनस्ताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
राज्याच्या काना कोपऱ्यात सेवा पुरविणाऱ्या एसटी बस रस्त्यात नादुरुस्त होणे, गळक्या बस, सिट, काचा तुटलेल्या बस प्रवाशांसाठी काही नवीन नाही. परंतु बसधील अस्वच्छतेमुळे आता प्रवाशांसोबतच एसटी कर्मचाऱ्यांसोबतच आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान सुरू केले होते.



याअंतर्गत सर्व आगाराप्रमुखांना एसटी बस आणि बसस्थानके स्वच्छ ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एसटी बस अस्वच्छ आढळल्यास आगारप्रमुखांना ५०० रुपये दंडाची घोषणा केली होती. मात्र हे अभियान आटोपल्यानंतर परिस्थिती जैसे थे झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.



आजही जिल्ह्यात धावणाऱ्या अनेक बसमध्ये केरकचरा, सिटलगत गुटखा, मावा खाऊन थुकलेले डाग दिसून येतात. चालकांची कॅबिन, डॅशबोर्ड, सिटखाली कचऱ्याचे साम्राज्य असते. कित्यके बसच्या सिटा फाटलेल्या, तुटलेल्या अवस्थेत असतात. खिडक्या तर अक्षरक्षः खुळखुळा झालेल्या असतात. स्थानकांची काही वेगळी अवस्था नाही. विशेष म्हणजे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानानंतर मात्र अनेक एसटी बसेसमध्ये अस्वच्छता असल्याचे दिसून येत आहे. या अस्वच्छ बस स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आगारप्रमुखांवर असली तरी या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र सध्या राज्य परिवहन महामंडळात बसस्थानकात दिसून येत आहे. त्यामुळे स्वच्छ बस न ठेवणाऱ्या आगारप्रमुखांना दंड करणार तरी कोणी, हा खरा प्रश्न आहे.

# अमरावतीकरांना जुन्या मालमत्ता करानुसार पावती द्या; आयुक्तांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महापालिका प्रशासनाने वाढवलेल्या मालमत्ता कराला स्थगिती देण्यात आली आहे. त्यानुसार मनपा आयुक्तांनी तातडीने सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक दुरुस्ती करून अमरावतीकरांना जुन्या मालमत्ता करानुसारच पावती देण्याचे सक्तीचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी नियोजन भवन येथे दिले.



अमरावती शहरात १४२० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री पवार हे आले होते. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातीलनियोजन भवनातील मुख्य कार्यक्रमात आ. सुलभा खोडके यांनी शहरातील मालमत्ता करवाढीचा प्रश्न उपस्थित केला. शासनाने वाढीव मालमत्ता कराला स्थगिती दिली असतानादेखील महापालिका प्रशासनाकडून जुन्या मालमत्ता करानुसार नागरिकांना पावती मिळत नसल्याचे सांगितले. त्यामुळे मार्गदर्शन करताना ना. पवार म्हणाले, महापालिकेने केलेल्या वाढीव मालमत्ता कराला स्थगिती देण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर ही स्थगिती मिळाली आहे. आता महापालिकेच्या सॉफ्टवेअरमध्ये दुरुस्ती आयुक्तांनी तातडीने करावी आणि अमरावतीकरांना जुन्या मालमत्ता करानुसारच पावती देण्यात यावी, तसेच त्यासाठी काही अडचणी येत असेल तर तसे स्पष्ट करावे, असेही ना. पवार म्हणाले. पुढील महिन्यातील अमरावती दौऱ्यापर्यंत सॉफ्टवेअर अपडेट नसल्याची तक्रार येता कामा नये, असा स्पष्ट इशाराही त्यांनी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांना दिला.

# धारणी शहरात प्रस्तावित नवीन कराविरोधात 'हॉट टॉक' टळला सूचनापत्र नव्याने देण्याचे केले मुख्याधिकाऱ्यांनी मान्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ धारणी**

प्रस्तावित नवीन कराविरोधात सुनावणीदरम्यान गरमागरमीची शक्यता लक्षात घेता, मालमत्ताधारकांना नव्याने सविस्तर विवरण असलेले सूचनापत्र देण्याचे आदेश मुख्याधिकाऱ्यांना देत हा विषय तात्पुरता स्थगित ठेवला.

नगरपंचायत धारणीमार्फत गेल्या महिन्यात सुधारित प्रस्तावित कराबाबत नोटीस देण्यात आली होती. नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीत आलेल्या हरकतींवर आज सुनावणी करण्यात आली होती. परंतु, नगरपंचायतने केलेल्या सर्वेबाबत आणि नियोजित कर भरण्याची विस्तृत माहिती न देता केवळ नोटीस देण्यात आली होती. त्यामुळे अनेकांना २० ते ४० पट, तर कोणाला ८० पट जास्त प्रस्तावित कर भरणा नोटीस पाठविण्यात आली होती. यामुळे मालमत्ताधारकांमध्ये नगरपंचायत विरोधात रोष पसरला होता. आज मुख्याधिकारी यांच्यासमक्ष बारा वाजता सुनावणी घेण्याचे ठरले होते. ज्या- ज्या लोकांनी हरकत घेतली होते, अशा लोकांच्या हरकतीवर आज सुनावणी होणार होती. परंतु, मालमत्ताधारकांना सविस्तर माहिती न देता बजावलेली नोटीस अवैध असून मालमत्ताधारकांना नव्याने सविस्तर विवरण असलेले सूचनापत्र देण्यात यावे आणि नव्याने सुनावणी घेण्यात यावी, असा सूर उमटला. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी बुधवारी होत असलेली सुनावणी स्थगित करून सविस्तर सूचना देणारी नोटीस मालमत्ताधारकांना देण्याचे निर्देश दिल्याने जनतेत असलेला रोष थंडावला. यावेळी माजी आमदार केवलराम काळे, व्यापारी वर्गातून रतनलाल परिहार, आप्पा पाटील, मनोहर मोरे, मोहम्मद सुलेमान अब्बा उमर, डॉ. शैलेश जिराफे, युगंधर सोनोने आणि मोठ्या प्रमाणे मालमत्ताधारक उपस्थित होते.

# प्रविण पोटे पाटील यांची पारायण सोहळ्याला भेट श्रींच्या पादुकांचे घेतले दर्शन



**गुरुपुष्यामृत निम्मित श्री ब्रम्हांडनायक सेवा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा आयोजित श्री गजानन महाराज पारायण सोहळा व महाप्रसाद कार्यक्रमाला भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली व श्रींच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले तसेच महाप्रसाद मध्ये सहभाग घेतला.यावेळी संपूर्ण ब्रम्हांडनायक ट्रस्ट चे मान्यवर व भक्तगण उपस्थित होते.**

# महंमदखान महाराज पुण्यतिथी महोत्सवात नितीन कदम यांची भेट

## पंचक्रोशीतील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ भातकुली**

पंचक्रोशीतील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेले परमहंस श्री महम्मद खान महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त नितीन कदम यांनी तीर्थस्थळाचे दर्शन घेऊन जनसामान्यांसोबत भक्तिमय किर्तन व संत परंपरा आध्यात्माचा वैविध्यपुर्ण कार्यक्रमात सहभाग नोंदविला.भातकुली तालुक्यातील श्री. क्षेत्र गनोरी येथे हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रतीक व वारकरी संप्रदायाचे तीर्थक्षेत्र म्हणुन असंख्य भक्तगण पुण्यतिथी महोत्सवानिमित्त येथे मोठ्या प्रमाणात जिल्हाभरातून भेट देतात.भातकुली तालुक्यातलं श्री क्षेत्र गणोरी नाव पंचक्रोशीत सुपरिचित आहे ते, महंमदखान महाराज यांच्या नावानंच. डोमा नदीच्या तीरी वसलेल्या या गावात महंमदखान महाराज यांनी भारतीय संस्कृती आणि इस्लाम तत्त्वज्ञान यांचा सुरेख मेळ साधून धार्मिक सामंजस्य आणि सामाजिक सलोखा कायम राखण्याचं कार्य केलं. महाराजांच्या मंदिरात प्रवेश करताच हिंदू-मुस्लिम असा भेद आपोआपच गळून पडतो. गावकऱ्यांमध्ये महंमदखान महाराजांबाबत प्रचंड श्रद्धा आहे. विशेष म्हणजे महाराज अजूनही आपल्यातच आहेत, अशी भावना प्रत्येकात आहे. सदर पुण्यतिथी महोत्सवनिमित्त गावामध्ये कीर्तनाचे सामाजिक प्रबोधन करणारे कार्यक्रम,महाप्रसाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तालुकाभरातील तसेच जिल्हाभरातील हजाराच्या संख्येने भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. आपल्या विशिष्ट कार्यशैलीने शासनाकडून योग्य पाठपुरावा करून विकास कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याने (पांदन रस्ते व ईतर) व आपल्या सामाजिक लढ्याकरिता संस्थानाच्या शिष्टमंडळाकडून कदम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कदम यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष अमर देशमुख, परवेश कदम, अक्षय धुळस, संजय चूनकीकर,प्रफुल्ल महल्ले, मोहन भातकुलकर, विनोद पतालीया, परेश मोहोळ,स्वप्निल मालधुरे,अभिषेक सवाई, नितीन ठाकरे, सागर पंचबुद्धे, प्रणव सहारे व असंख्य भक्तगण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रविवारी धावणार तीन हजार धावक

## सातवी अमरावती मॅरेथॉन राज्यातील स्पर्धक होणार सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**



मॅरॉथॉन असोशिएशन व्दारे रविवार २९ सप्टेंबर रोजी सातव्याअमरावती मॅरॉथनचे आयोजन केले आहे.या अमरावतीसह, राज्यातील स्पर्धेमध्ये वराज्याबाहेरी तीन हजाराहून अधिक धावकांनी सहभाग नोंदविणार आहेत.ही मॅरॉथॉन २१, दहा व पाच किलोमीटर मुलांकरीता तसेच पाच किलोमीटर फिटनेसरन सर्वाकरिता या प्रकारात होणार आहे. २१ किलोमीटरची स्पर्धा रविवारी सकाळी ६वाजता सुरु होणार आहे. तर दहा किलोमीटर पॉवर रन सकाळी ६.१५वाजता, पाच किलोमीटर मुलांचा रन पहाटे ६.३० वाजता आणि पाच किलोमीटरफिटनेस रन सकाळी ६.४० प्रारंभ होणार आहेत. धावमार्गात शारिरीक वेदनाशमक स्प्रे सुध्दा ठेवण्यात येणार आहेत. सदर मॅरॉथॉन सुरळीत पार पडण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयाकडून वाहतूक पोलिसाची मदत घेतल्या जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

**या सुविधा पुरविल्या जाणार**

मॅरॉथॉन चे मार्गात पंचावटी व इर्विन चौक येथे धावकांवर पुष्पवर्षावकरण्यात येणार आहे. धावकांचा उत्साह कायम राहण्यासाठी मॅरॉथॉनच्यामार्गात दोन ठिकाणी धावकांचे तुतारीने स्वागत केले जाणार आहे. मॅरॉथॉनसुरु होण्यापुर्वी वार्मअप व्हावा यासाठी मॅरॉथॉनच्या स्टार्ट पॉईन्टलाझुंम्बाचे आयोजन केले आहे. मॅरॉथॉनच्या मार्गात ७ ते ८ ठिकाणी वॉटरस्टेशन राहणार आहेत. याठिकाणी, एनरजेल, पाणी, खजूर, केळी, चॉकलेट, सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानातून पायाभूत सुविधा

## आदिवासीबहुल ३२१ गावांचा होणार कायापालट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

मेळघाटातील दुर्गम व अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे राज्यातील ४ हजार ९७६ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील मेळघाटसह अन्य ८ तालुक्यांतील ३२१ गावांचा समावेश आहे. या अभियानाच्या माध्यमातून या गावांमध्ये विविध प्रकारची कामे केली जाणार आहे. त्यामुळे या गावांचा कायापालट होणार आहे.



केंद्रीय कॅबिनेट मंत्रिमंडळाने नुकतीच प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी अभियानाला मान्यता दिली. या अभियानाद्वारे देशातील ३०राज्ये केंद्रशासित प्रदेशातील ५४९जिल्ह्यांमधील २ हजार ७४० ८४३ तालुक्यांतील ६३ हजार आदिवासीबहुल गावांचा साधला जाणार आहे. विकास या अभियानांतर्गत या गावांमध्ये ७९ हजार २५७ कोटी रुपयांची विकासकामे केली जाणार आहेत. यामध्ये केंद्र व राज्य सरकारचा वाटा असणार आहे. या अभियानांतर्गत १७ मंत्रालयीन विभागांना २५ प्रकारच्या योजना राबविण्यासाठी अनुसूचित जमातीसाठी विकास कृती आराखडा अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून पाच वर्षाच्या कालावधीत आपल्याला ठरवून दिलेली साध्ये प्राप्त करावयाची आहेत, या अभियानात अमरावती जिल्ह्यातील नऊ तालुक्यात ३२१ गावांचा यामध्येसमावेश आहे.या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी 'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान' जिल्ह्यातील अमरावतीसह अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा, दर्यापूर, धारणी, मोर्शी, वरुड या नऊ तालुक्यांमधील ३२१ आदिवासीबहुल गावांमध्ये राबविले जाणार असल्याचे सांगितले. धारणीच्या सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, प्रियंवदा म्हाडदळकर यांनी 'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान' जिल्ह्यातील सर्व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांच्या सहभागातून राबवून या ३२१ गावांचा सर्वागीण विकास करण्याचा मानस व्यक्त केला. या अभियानाला पुढील आठवडयात प्रारंभ होणार आहे.

### या सुविधावर राहणार भर

या विभागामार्फत आदिवासी बहुल गावांमध्ये पक्की घरे (प्रधानमंत्री आवास योजना), रस्ते (प्रधानमंत्री ग्रामसडक योजना), पाणीपुरवठा (जलजीवन मिशन), घरांचे विद्युतीकरण, नवीन सौरऊर्जा योजना, फिरती आरोग्य पथक (राष्ट्रीय आरोग्य अभियान), आयुष्यमान भारत कार्ड (प्रधानमंत्री जनआरोग्य योजना), एलपीजी कनेक्शन्स (प्रधानमंत्री उज्ज्वला योजना), अंगणवाडी केंद्राची स्थापना (पोषण अभियान), वसतिगृहांची स्थापना (समग्र शिक्षा अभियान), पोषण वाटिका (राष्ट्रीय आयुष अभियान), भारतनेट, स्किल इंडिया मिशन, शाश्वत शेती प्रसिद्धी, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना, राष्ट्रीय पशुधन मोहीम, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, ट्रायबल होम स्टे (स्वदेश दर्शन), आदी आदर्श ग्राम योजना या योजनांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

# राजापेठ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्थापन करण्याच्याआ.रवी राणा ची न्यायालयात साक्ष : पुढील सुनावणी दिनांक १ऑक्टोबर रोजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शेतकरी शेतमजुरांच्या न्याय मागण्यासाठी केलेल्या आंदोलनातील आमदार रवि राणा यांच्यासह युवा स्वाभिमानी शिलेदारांची न्यायालयात हजेरी,राजापेठ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्थापन करण्याच्या खटल्यात सुध्दा सर्व शिवभक्त व स्वाभिमानी शिलेदारांचे बयाण नोंदवीण्यात आले.आमदार रवी राणा व माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी भव्य आंदोलन करण्यात आले होते, तसेच राजापेठ उड्डाणपुलावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा स्थापित करण्यात आला होता.या संदर्भात मा.न्यायमूर्ती श्रीमती चांडक मॅडम यांच्या न्यायालयात खटला सुरू असून,आज आमदार रवी राणा यांच्यासह सर्व आंदोलकांनी न्यायालयात उपस्थित राहून आपले बयान नोंदविले, या खटल्याची पुढील सुनावणी दिनांक १ऑक्टोबर रोजी होणार आहे.


# तांदळाच्या भावात वाढ झाल्याने मुरमुरा व पोहा महागला

## खोबरा २०० पार, नारळ १९०० रूपये पोते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

सध्या सणासुदीचे दिवस असल्याने किराणा बाजारामध्ये भाव वाढ सुरू झाली असून समोर नवरात्र व दिवाळी असल्याने आतापासूनच किराणा मालाचे भाव वाढ सुरू झाली आहे. नारळ, खोबरा, खोबरा किस यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. १ हजार २५० ते १ हजार ३०० रूपये असणारे नारळाचे पोते १ हजार ९०० रूपयांवर पोहोचले आहे. खोबरा किस १५० रुपये किलो होता, तो २५० रूपये प्रतिकिलोवर पोहोचला आहे. १५० रूपये किलो असणारा खोबरा २०० रूपयांवर पोहोचला आहे.

केंद्र सरकारने तेलामध्ये तब्बल २५ टक्के आयात शुल्क वाढ केल्याने तेलाची भाव वाढ सतत सुरू आहे. दीड हजार रूपयांचा सोयाबीन पिंप १ हजार ९०५ वर पोहोचला आहे. १ हजार ६०० रुपयाचा सनफ्लावरचा पिंप १ हजार - ९५० रूपयांवर पोहोचला आहे. - सोयाबीन तेल एक लिटरचे पाकीट १०० रूपये होते, १२५ रूपयांवर आहे. ५२५ रूपये असलेली - सोयाबीन पाच लिटरची कॅन ६७० वर पोहोचली आहे. तेलाचे भाव यामध्ये तब्बल २५ टक्के वाढ झाल्याने तेलाशी संबंधित वस्तूंमध्ये भरमसाठ वाढ - झाली आहे. हॉटेल व रेस्टॉरंटमध्ये - विकल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये वाढ झाली आहे. पॅकेजिंग चिवडा, फलारी चिवडा, नमकीन, चिप्स यामध्ये वाढ झाली आहे. तांदळाच्या भावात ३०० रूपये प्रतिकिलोची वाढ झालेली आहे. कोलम तांदळाचे भाव ६ हजार २०० प्रतिक्विंटल होते, तो आता वाढून ६ हजार ५०० झाले आहे. ३ हजार ३०० रुपये असणारा गहू ३ हजार ६०० वर पोहोचला आहे. ७ हजार २०० असणारा चिन्नोर तांदूळ ७ हजार ६०० वर पोहोचला आहे. येणारे दिवस सणासुदीचे असल्याने डाळींमध्येहीतेजी दिसून येते. चणाडाळ ९५ रुपये प्रतिकिलो, तूर डाळ १६०, मूग मोगर डाळ १२०, मूग डाळ ११०, मसूर डाळ ९०, मोट ९०, बरबटी ९०, वटाणा १७०, चपटा वाटाणा १००, चना ९० रूपये किलो किरकोळ बाजारात विकल्या जात आहे. तांदळाच्या भावात भरमसाठ वाढ झाल्याने त्याचा परिणाम पोहाच्या दरवाढीमध्ये झाला आहे. पोहाचे भाव - २०० रुपये प्रतिक्विंटलने वाढले आहे. जाड पोहा ५० रुपये किलो, पातळ पोहा - ५५ रुपये किलो बाजारात विकल्या जात आहे. मुरमुराचे सुद्धा भाव वाढले - आहे. ६०० रुपये असणारा मुरमुऱ्याचा पोता ७०० रूपयांवर पोहोचला आहे. प्रतिकिलो मुरमुरेमध्ये पाच रुपयाची वाढ झाली आहे. दलिया १२० रुपये २ प्रतिकिलो, शेंगदाणा १२०, साबुदाणा १०, भगर १२० रूपये किलो किरकोळ बाजारात विकल्या जात आहे.



**महागाईने लाडक्या बहिणीचे बजेट बिघडले**

गव्हाच्या भावात वाढ झाल्याने आटा, रवा, मैदा यांच्या भावात वाढ झाली आहे. आता रवा मैदाचे भाव प्रतिकिलो पाच रुपये वाढले आहे. परिणामी काही ब्रेड कंपन्यांनी सुद्धा भाव वाढविले आहे. एकीकडे सरकार लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली प्रत्येक बहिणीला दीड हजार रूपये महिन्याला देत आहे, मात्र महागाईमुळे त्याच बहिणीचे कंबरडे पार मोडून चालले आहे. सामान्य माणूस महागाईने होरपळून चालला आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे अमरावतीत आगमन

## दुपारनंतर बैठकीला सुरुवात; कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे विधानसभेसाठी 'मिशन विदर्भ' साठी रणनीती आखत आहेत. २७ आणि २८ सप्टेंबर रोजी दोन दिवस मनसे अध्यक्ष राज ठाकरे अमरावती दौऱ्यावर असणार आहेत. यावेळी ते विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतील. २७ तारखेला पश्चिम विदर्भातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम आणियवतमाळ्यापाचजिल्हाचा आढावात्यांच्याकडून घेण्यात येणार आहे. तर २८ तारखेला नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, आणि चंद्रपूर जिल्हाचा आढावा घेतला जाणार आहे.

राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यापूर्वी ७ उमेदवार जाहीर केले आहेत. आता मनसे विधानसभा निवडणुकीसाठी विदर्भातून पहिली यादी राज ठाकरे जाहीर करण्याची शक्यता आहे. आज २७ तारखेला सकाळी ७.३० वाजता राज ठाकरे यांच अमरावतीत रेल्वे स्टेशनवर आगमन होताच मनसे कार्यकर्त्यांनी ढोल ,ताशे,फटाके फोडत जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळीकार्यक्रमा दरम्यान राज ठाकरे विधानसभा निवडणुकीसाठी विदर्भातील नेत्यांची यादी जाहीर करतील असे बोलले जात आहे.

दुपार नंतर अमरावतीच्या ग्रँड महाफील हॉटेल मध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या बैठकीला सुरवात करण्यात आली. आज पश्चिम विदर्भातील ५ जिल्ह्यातील मनसे पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला सूरवात. सुरवातीला महिला पदाधिकाऱ्यांशी राज ठाकरे यांनी संवाद साधला. नंतर अमरावती जिल्ह्यातील सर्व ८ विधानसभा मतदारसंघाचा राज ठाकरे आढावा घेत आहे.

प्रत्येक्ष बोलून राज ठाकरे आपल्या आपल्या मतदार संघात कशी परिस्थिती त्या अनुषंगाने कसं नियोजन करायचं या याबाबत संवाद साधत आहे. पश्चिम विदर्भातील ३० विधानसभा मतदार संघाचा मतदार संघ निहाय राज ठाकरे आढावा घेत आहेत. जिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख,शहर प्रमुख बैठकीला उपस्थित विदर्भातील सर्वच जागांवर राज ठाकरे यांची चाचपणी मोठ्या प्रमाणावर मनसे कार्यकर्ते उपस्थित आहेत.

### अमरावती शहरात मनसेची बॅनरबाजी... ठाकरे घराण्यातील स्वाभिमानी भावी मुख्यमंत्री राज ठाकरे असा बॅनरवर उल्लेख....

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे आज पासून दोन दिवस अमरावती दौऱ्यावर आहेत, त्यामुळे अमरावती शहरात ठीक ठिकाणी राज ठाकरे यांच्या स्वागताचे बॅनर लागले मात्र त्यातील बॅनरची जोरदार चर्चा सुरू झाली आहे, ठाकरे घराण्यातील स्वाभिमानी भावी मुख्यमंत्री हिंदू जननायक श्री राज साहेब ठाकरे यांच अंबानगरीत मनःपूर्वक स्वागत. असा उल्लेख असलेलं बॅनर हॉटेल ग्रँड महफील समोर लावण्यात आले आहे,याच हॉटेलमध्ये राज ठाकरे यांच मुक्काम असणार आहे,आतापर्यंत भावी मुख्यमंत्री असा राज ठाकरे यांचा उल्लेख असलेलं बॅनर लागलेलं आपण बघितलं पण ठाकरे घराण्यातील स्वाभिमानी भावी मुख्यमंत्री* राज ठाकरे असा उल्लेख केल्याने या माध्यमातून अप्रत्यक्षणपणे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर ही टिकाच म्हणावं लागेल, कारण कॉंग्रेस व राष्ट्रवादी सोबत युती करून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते पण आता थेट राज ठाकरे भावी मुख्यमंत्री तेही स्वाभिमानी असा उल्लेख केल्याने चर्चेला उधाण आले आहे.

# पावसामुळे सप्टेंबर हीटपासून झाली सुटका

## दररोज लावत आहे हजेरी: पारा घसरून २८.९ अंशांवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

९ व १० सप्टेंबर रोजी जिल्ह्याला झोडपून काढल्यानंतर पावसाने उसंत घेतली होती. मात्र, यामुळे उकाडा वाढून जिल्हावासीयांच्या अंगावर घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या. मात्र, मागील दोन-तीन दिवसांपासून पाऊस परतून आला असून, दररोज हजेरी लावत असलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. परिणामी पारा घसरून गुरुवारी २८.९ अंशांवर आला होता.

यंदाच्या पावसाची खेळी कुणालाही समजून आली नाही. जूनमध्ये डोळे वटारल्यानंतर १९ जुलैपासून मात्र पाऊस जिल्ह्यावर मेहेरबान झाला. त्यानंतर पावसाने धो-धो धुतल्यानंतर पूर परिस्थितीचा सामना जिल्हावासीयांना करावा लागला आहे. हीच स्थिती ९ व १० सप्टेंबर रोजी संततधार बरसलेल्यापावसामुळे झाली होती व दुसऱ्यांदा पूर आला होता. असे असतानाच पावसाने मध्यंतरी उसंत घेतली व उकाडा वाढून जिल्हावासीयांना ऑक्टोबर हीटचा फटका सप्टेंबरमध्येच बसू लागला. उकाड्यामुळे घामाच्या धारा वाहू लागल्याची स्थिती निर्माण झाली होती.

मात्र, मागील दोन-तीन दिवसांपासून वरुणराजा परत मेहेरबान झाला असून, दररोज हजेरी लावत असलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

### हवामान खात्याने दिला येलो अलर्ट

हवामान खात्याने जिल्ह्याला शुक्रवार,शनिवार येलो अलर्ट दिला असून पावसाचा अंदाज वर्तविला आहे. जिल्ह्यात सध्या दररोज पाऊस हजेरी लावत असल्याने वातावरण गार आहे. त्यातच आता आणखी चार दिवस पावसाचे असून त्यात पावसाची आकडेवारी आणखी वाढणार यात शंका वाटत नाही.

पावसामुळे पारा घसरला असून ३४ अंशांवरील पारा गुरुवारी २८.९ अंशांवर आला होता.

# दसरा, दिवाळी तोंडावर; रेल्वेचे तिकीट विसरा! बुकींग फुल्ल

## चार महिने आधी तिकीट बुकिंग सुरू : ऐनवेळी गोंधळ नको



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

फिरायला जायचा प्लॅन केल्यानंतर सर्वप्रथम प्रश्न निर्माण होतो रेल्वेच्या तिकीट बुकिंगचा. कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी आधी रेल्वेचे तिकीट बुक करावे लागते.

मात्र, आपल्याला हवे त्या तारखेचे तिकीट एकतर मिळत नाही किंवा वेटिंगवर राहावे लागते. आगामी दसरा, दिवाळी सणांनिमित्त लवकर बुकिंग करा, अन्यथा वेटिंगवर राहावे लागणार आहे. दिवाळीनिमित्त पर्यटक आणि रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष गाड्या सोडल्या जातात. पण वेळीच तिकीट काढले तर वेटिंगवर राहावे लागणार नाही.

दिवाळीत अनेक कुटुंब शाळांची सुटी व सण साजरा करण्यासाठी बाहेर पडतात. यानिमित्त महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. रेल्वेच्या नियमानुसार चार महिने आधी तिकीट बुकिंग सुरू केले जाते. यंदाही दिवाळीच्या दिवसांतील अनेक गाड्यांचे बुकिंग फुल्ल झाले आहे.

**स्लीपर-एसीही मिळेना**

सण सुरू झाल्याने लोक फिरण्यासाठी, धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी जातात. पण ट्रेनचे बुकिंग करताना वेटिंग र तिकीट मिळत आहे. आता नागरिकांना ट्रेनचे स्लीपर आणि एसी तिकीट मिळत नाही.

**आतापासून गाड्यांना वेटिंग**

विशेष रेल्वेत मिळणाऱ्या सुविधा, वेगवान प्रवासामुळे इतर रेल्वेंच्या तुलनेत अधिकचे प्रवास भाडे असले तरीही प्रवाशांकडून अधिक पसंती या विशेष गाड्यांना दिली जाते. त्यामुळे या गाड्यांच्या आरक्षणासाठी प्रतीक्षा करावी लागते.

**सर्वाधिक गर्दी मुंबई-पुणे मार्गावर**

मुंबईत विविध कामांनिमित्ताने ये-जा करणाऱ्यांची संख्या अधिक असते तर पुणे शिक्षणाचे केंद्र आहे. त्यामुळे या मार्गावर प्रवाशांची नेहमी गर्दी असते. आता विशेष ट्रेनसह इतर पॅसेंजर सुरू असल्याने त्या गाड्यांनाही प्रवाशांनी गर्दी केली आहे.

**विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन**

दिवाळीच्या दिवसांत रेल्वेला मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार आहे. त्यामुळे दिवाळी सुटीच्या काळात विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाकडून केले जाणार आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## टाकलेला घास तसाच पडून: काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर? पितृ पंधरवड्यात नैवेद्य शिवण्यासाठी कावळे दिसेनात




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

पितृ पंधरवडा म्हटले की यापंधरा दिवसांत पितरांना जेवू घालण्याची लगबग असते. पितरांसाठी केलेल्या नैवेद्याला काकस्पर्श होणे या दिवसांत महत्त्वाचे मानले जाते. मात्र, शहरात अनेकदा नैवेद्याला कावळा शिवत नसल्याने काकस्पर्शासाठी बरीच प्रतीक्षा करावी लागते. काक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असून, जेवणावळींनाही घरघर लागली आहे. पितृ पंधरवड्यात काकस्पर्शाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याशिवाय पितर म्हणून जेवू घालणाऱ्या व्यक्तीलाही तितकेच महत्त्व आहे. पूर्वी पितर म्हटले की भल्या पहाटेपासून पितराचा स्वयंपाक बनविण्यासाठी घरातील स्त्रियांची लगबग असे. घरोघरी दिवसभर जेवणावळी सुरू असत. परंतु, विभक्त कुटुंबीय पद्धतीमुळे आता हे चित्र बदलले आहे.सध्या वातावरणातील बदलांमुळे कावळ्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. वृक्षतोड, नष्ट होणारे नैसर्गिक पाणवठे, पर्यावरणातील मानवी हस्तक्षेप, पर्या- वरणातील बदल अशा अनेक गोष्टी त्यासाठी कारणीभूत आहेत. पक्षिमित्र, पक्षिनिरीक्षक बऱ्याचदा याबाबत चिंता व्यक्त करीत आहेत. अन्य पक्ष्यांसह कावळ्यांचीही संख्या काही भागांत घटलेली पाहायला मिळते.

**जीवनसाखळीत बाधा येण्याचा धोका**

मनुष्य निसर्गात फेकत असलेले रेडिमेड खाद्य पक्ष्यांना मिळू लागल्याने नैसर्गिक अधिवास धोक्यात येऊन प्रजाती नष्ट होत आहेत. जीवनसाखळी तुटण्याचा धोका निर्माण झाल्याचे चित्र आहे. पर्यावरणासाठी ही चिंतेची बाब असल्याचे पर्यावरणप्रेमी डॉ.जयंत वडतकर यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांची घोर थट्टाच: कवडीमोल भावामध्ये शेतकऱ्यांमध्ये रोष

## पिवळेपणा सारखाच; पण एकाला ७६ हजार, तर दुसऱ्या सोन्याला ४ हजार ३०० रुपये भाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

सोन्याचे भाव गगनाला भिडले आहेत. सोने प्रति तोळा ७६ हजार रुपयांच्या वर पोहोचले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या पिवळ्या सोन्याला अन् सोयाबीनला कवडीमोल भाव मिळत असून केवळ ४ हजार ३०० रुपये प्रति क्विंटल दराने बाजारात विकल्या जात आहे. पिवळेपणा सारखाच; पण दोन्ही सोन्यातील ही विसंगती शेतकऱ्यांसाठी जीवघेणी ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

सोयाबीनचा उत्पादन खर्च व बाजारात त्याला मिळत असलेला भाव हे गणितच नुकसानीचे आहे, तरीही सोयाबीनला शेतकऱ्याचे पिवळे सोने संबोधले जाते. या सोन्याची कुणीही दखल घ्यायला तयार नाही. मात्र, खरे सोने ७६ हजार रुपये तोळ्यांवर पोहोचल्याने आमच्या सोन्याचे भाव मातीमोलच राहील का? असा प्रश्न शेतकरी विचारू लागले आहेत. शेतकरी कपाशीला पांढरे सोने व सोयाबीनला पिवळे सोने, असे संबोधतात. शेतकऱ्यांच्या या दोन्ही सोन्याचे भाव दरवर्षी वाढण्यापेक्षा दररोज कमी होत आहे. शासन दरबारी शेतकऱ्यांची ओरड कायम असताना कोणतेही सरकार आले तरी त्यांच्या मागणीची पूर्तता केल्या जात नाही. सत्तेवरअसणारे सरकार विरोधातील सरकारच्या नावाने बोटे मोडतात तर ते सरकार सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसतात, असा अनुभव शेतकऱ्यांना येत आहे.

**सकारात्मक उपाययोजना व्हावी**

मुलांच्या लग्नात एक तोळा सोने घेतो म्हटले तरी १७ ते १८ क्विंटल सोयाबीन विकावे लागेल. एकरी पाच क्विंटल सोयाबीनचा उतारा पकडला तर एक तोळा सोन्यासाठी तीन ते चार एकरातील सोयाबीन विकावे लागेल, अशी केविलवाणी परिस्थिती आहे. शेतकरी एक तोळा नव्हे तर आजच्या परिस्थितीत एक ग्रामही सोने घेऊ शकत नाही, ही अवस्था आहे. शेतकरी नव्या उभारीने उभा झाला पाहिजे, यासाठी शेतमालाचे उत्पादन खर्चानुसार भाव वाढवून सकारात्मक उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# भाजपच्या तंबूचे संजय राऊत यांना दुःख, बांबू त्यांच्यात गेल्यावर कळेल : राधाकृष्ण विखे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे कायम वैफल्यातून टीका करत असतात.




भाजपने तंबू ठोकल्याने त्यांना अतिशय दुःख झाले आहे. आता हाच बांबू त्यांच्यात गेल्यावर त्यांना भाजपची आणि सरकारची ताकद कळेल, अशा खोचक शब्दात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संजय राऊत यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. अमित शहा यांच्यावर टीका करताना संजय राऊत यांनी त्यांनी महाराष्ट्रात तंबू ठोकला असल्याचे म्हटले होते.

संजय राऊत यांच्या या टीकेला महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ते कायम औरंगजेबाचे उदत्तीकरण करत होते. त्यांच्याच काळामध्ये औरंगजेबाच्या कबरीवर फुले वाहिली गेली, हे जनता विसरलेली नसल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे.